# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED & MULTILINGUAL STUDIES

UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Volume V
Issue I

ISSN : 2394-207X (Print)
IMPACT FACTOR : 4.205

January 2018

A Galaxy of Scholarly Written Research Papers/Articles

IJMMS

Cosmos

Chief Editor
Dr. V. H. Mane

Executive Editor
Prof. M. P. Shaikh

www.ijmms.in

Email : ijmms14@gmail.com

| Advisory Board | |
|---|---|
| **Dr. Rajaram Zirange**, Professor and Head, Dept. of English, Bharati Vidyapeeth University, Pune, India | **Dr. Coomi Vevaina**, Professor, Dept. of English, Mumbai University, Mumbai, India |
| **Dr. Gholamreza Fathipour**, Professor, Islamic Azad University of Hamedan, Iran | **Dr. Chandrakant Rawal**, Principal, Brihan Maharashtra College of Commerce, Pune, India |
| **Dr. Ajit More,** Director, Master of Computer Application, IMED, Pune, India | **Dr. Srinivasrao Teki**, Professor, Dept. of Management, International College of Automotive, Malaysia |
| **Dr. Ananta Pegu,** Professor, Dept. of Economics, N.C.College, Badarpur, Karimganj, Assam, India | **Dr. Ravindra Thakur**, Professor, Dept. of Marathi, Shivaji University, Kolhapur, India |
| **Dr. Soumya Ghosh**, Dept. of Biotechnology, Stellenvosch University, South Africa | **Dr. Susan Silverstone**, Professor, Dept. of Commerce, National University, San Diego, Canada |
| **Prof. Karma Yoezer**, Professor, Dept. of Economics, School of Social Sciences, Royal University of Bhutan, Bhutan | **Dr. Utpal Kumar**, Professor, Dept. of Management, Patna University, Patna, Bihar (India) |

| Editorial Board | |
|---|---|
| **Dr. Pratibha Gaikwad**, Principal & Professor, D.G. College Satara, Shivaji University Kolhapur, India | **Dr. Antonis Balssopoulos,** Professor, University of Nikosia, Cyprus., Cyprus |
| **Dr. Vivek Rankhambe**, Professor, Bharati Vidyapeeth University, Pune, India | **Dr. Caroline Edwardsi**, Professor, Dept. of English, University of Lincoln, UK, |
| **Prof. Vitthal A. Naikwadi**, Director, Knowledge Resource Center, Baburaoji Gholap College, Pune, India | **Dr. Dorji Waugchuk**, Professor, Dept. of English, School of Arts & Humanities, Royal University of Bhutan, Bhutan |
| **Dr. Yogesh B. Khollam**, Co-ordinator Research Center, Dept. of Physics, Baburaoji Gholap College, Pune, India | **Dr. Paul Odundo**, Professor, University of Nairobi, Kenya |
| **Dr. Majeed A. Hatif Al Maryani**, Professor, Dept. Of Accounting, Al-Qadisiya University, Iraq. | **Dr. Pandit N. Shelke**, Principal, Annasaheb Waghire College of Science, Arts and Commerce, Otur University of Pune, Pune, India |
| **Mr. Ali Ghahremanlou**, Research Scholar, Canada | **Dr. Ashutosh Jawadekar**, Professor, Dept. of English, Pune, India |

| Technical Assistance | |
|---|---|
| **Dr. Vinod B. Mane**, Bharati Vidyapeeth University, Pune, India | **Mrs. Sunita S. Chavan**, Research Scholar, SRTMU, Nanded, India |

VOLUME-V, ISSUE-I ISSN (Print): 2394-207X
IMPACT FACTOR: 4.205
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

## UGC Approved Research Journal (Sr. 47674)

Editors: Dr. V. H. Mane, Prof. M. P. Shaikh

Language: Multilingual

Published by

INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

Sneh Apartment,
Flat No. 001, Samarth Nagar, New Sangvi,
Pune- 411027

Copyrights: Editors 2014

All rights reserved

ISSN: 2394-207X (Print)
IMPACT FACTOR: 4.205

VOLUME-V, ISSUE-I

January -2018

# अनुक्रमणिका



| अ.क. | शोधनिबंधाचे नाव | नाव | पान नंबर |
|---|---|---|---|
| 1. | वाचन प्रेरणा दिवस ते राष्ट्रीय परिषद | [1]प्रा. विठ्ठल नाईकवाडी<br>[2]प्रा. वसंत गावडे | 1-3 |
| 2. | वाचन व समाज. सहसंबंध | प्रा. डॉ. चंद्रकांत भगवंत पोतदार | 4-6 |
| 3. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | प्रा.शिल्पा अश्विनकुमार पाटील | 7-10 |
| 4. | वाचन संस्कृतीचा विकास | बाळासाहेब शांताराम देविकर | 11-13 |
| 5. | वाचनसंस्कृतीचा विकास होणे काळाची गरज | प्रा. वर्षा अ. तिडके (शनिवारे) | 14-16 |
| 6. | वाचन कौशल्य तंत्र आणि प्रकार | डॉ. हनुमंत लक्ष्मण भवारी | 17-20 |
| 7. | वाचनकौशल्य, तंत्र आणि प्रकार वाचकांमध्ये रुजविण्यासाठी ग्रंथालयाची भूमिका | [1]प्रा. महादेव नागनाथ चव्हाण<br>[2] प्रा. सुधीर रामचंद्र माळी<br>[3]प्रा. श्रीमती ज्योती रमेश यादव | 21-26 |
| 8. | नकाशा वाचनाचे तंत्र व कौशल्य | [1]प्रा. रमेश गोपाळे<br>[2]डॉ. विलास पाटील | 27-32 |
| 9. | वाचनसंस्कृती व माहिती तंत्रज्ञान | कुंडलिक चिंधू पारधी | 33-35 |
| 10. | संशोधन कार्यात ग्रंथालयांची बदलती भूमिका | [1]डॉ. एन.एस.गिरी<br>[2]प्रा. दिपाली रामदास चिंचवडे | 36-38 |
| 11. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. लहू दिगंबर वाघमारे | 39-41 |
| 12. | वाचन संस्कृतीचा विकास | श्रीम. मनिषा प्रकाश वरवडेकर | 42-46 |
| 13. | ग्रंथालयाची बदलती भूमिका-पुस्तकाच गाव | व्यंकट सूर्यवंशी | 47-52 |
| 14. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | वसंत गावडे | 53-57 |
| 15. | माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ग्रंथालयाची भूमिका | सौ. पाटोळे स्मिता प्रकाश | 58-60 |
| 16. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | प्रा. अमोगसिद्ध चेंडके | 61-64 |
| 17. | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ . शैलेंद्र पंढरीनाथ काळे | 65-66 |
| 18. | छात्राध्यापकांचा ग्रंथालयाचा वापर वाढवण्यासाठी उपचारात्मक कार्यक्रम व त्याची परिणामकारकता | संध्या गिरीष यादव | 67-72 |
| 19. | वाचन संस्कृती वाढीसाठी ग्रंथालयाची भूमिका | डॉ. आर. एच. थोरवे | 73-76 |
| 20. | कार्ल मार्क्सचे वाचन आणि लेखन | डॉ. घ. ना. पांचाळ | 77-78 |
| 21 | संशोधनातील साहित्य संदर्भाचा अभ्यास | डॉ. एस. के. ढगे | 79-82 |
| 22 | वाचन व तरूण: सहसंबंध आणि वास्तव | प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी | 83-84 |
| 23 | वाचनकौशल्य व वाचनसंस्कृतीचा विकास | प्रा . डॉ . सुभाप दिनकर आहेर | 85-87 |
| 24 | वाचन कौशल्य : तंत्र आणि प्रकार | गणेश निवृत्ती चौधरी | 88-90 |
| 25 | वाचन व समाज सहसंबंध आणि वास्तव | प्रा. डॉ. अर्चना कुदळे | 91-93 |
| 26 | संशोधनात ग्रंथालयाचे महत्त्व | डॉ. सी. पी. हासे | 94-98 |

| | | | |
|---|---|---|---|
| 54 | वाचन संस्कृती विकास आणि ग्रंथालयांची भूमिका | प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे | 188-190 |
| 55 | वाचन संस्कृति और जनसंचार माध्यमों की भूमिका | डॉ . मीना ठाकूर | 191-192 |
| 56 | वाचकांची बदलती अभिरूची | डॉ. बी. डी. गव्हाणे | 193-194 |
| 57 | वाचनाचे महत्व व वाचन कौशल्य | प्रा. अनुराधा वसंत गुजर | 195-196 |
| 58 | वाचनाचे महत्व | प्रा . हारपुडे सुरेखा | 197-199 |
| 59 | वाचन संस्कृती संवर्धनात ग्रंथप्रदर्शनाचे योगदान | [१]डॉ. पांचाळ जी.एन.<br>[२]जाधव मारोती बालाजी | 200-200 |
| 60 | संशोधनात संगणकाचे महत्व | डॉ . पी . व्ही . कदम | 201-204 |
| 61 | वाचन व (आदिवासी) समाजः सहसंबंध आणि वास्तव | प्रा . महादेव रोकडे | 205-206 |
| 62 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. पौर्णिमा कोल्हे | 207-208 |
| 63 | वाचन संस्कृती आणि डिजिटल युग | श्री. प्रविण चंद्रकांत कुंभार | 209-211 |
| 64 | वाचन संस्कृती व माहिती तंत्रज्ञान | प्रा . राजेश ल . शिंगडा | 212-214 |
| 65 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | सारिका व्ही. पाटील | 215-217 |
| 66 | वाचन व समाज सहसंबंध आणि वास्तव | श्री. भाईदास शंकर जाधव | 218-220 |
| 67 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. सुवर्णा रा. गाडगे | 221-223 |
| 68 | वाचन संस्कृती और मीडिया का बदलता प्रवाह | प्रा . संध्या तायडे | 224-225 |
| 69 | मानवी जीवनात वाचनाचे महत्त्व | प्रा. संगीता मुंढे | 226-227 |
| 70 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्त्व | डॉ. संजय शिंदे | 228-230 |
| 71 | ग्रंथालयात रि-इंजिनिअरिंगची आवश्यकता | प्रा. संजय क्षीरसागर | 231-232 |
| 72 | वाचन चळवळीचा जागर | श्री. सरदार निवृत्ती पाटील | 233-235 |
| 73 | वाचन करताना वाचन संस्कृती जोपासावी | प्रा. डी. आय. शिंगाडे | 236-238 |
| 74 | वाचन संस्कृती काल आणि आज | डॉ. वंदना एच. जामकर | 239-241 |
| 75 | मानवी जीवनात वाचनाचे महत्व | सुस्मिता महादेव वाळके | 242-244 |
| 76 | वाचनसंस्कृती विकास आणि ग्रंथालयशास्त्राची पाच सूत्रे | डॉ. सदाशिव पाटील | 245-246 |
| 77 | मानवी जीवनातील वाचनाचे महत्व | प्रा . डॉ . बागूल एम . एम | 247-249 |
| 78 | वाचकांची सौंदर्याभिरूची | डॉ . प्रकाश हिवराळे | 250-256 |
| 79 | बदलते वाचन माध्यम आणि बदलती वाचन संस्कृती | संतोष लिंबराज सास्तुरकर | 257-258 |
| 80 | संशोधनातून साहित्याचे वाचन | [1]विनोद दाजीराम रणपिसे<br>[2]डॉ.एन.बी.शेख | 259-260 |
| 81 | वाचन संस्कृती आणि वर्तमानपत्रे | श्री . गणेश मुळे | 261-265 |
| 82 | सोशल मिडिया वाचक व अभिरूची | प्रा . बाळासो आण्णा सुतार | 266-271 |
| 83 | वाचन संस्कृती व माहिती तंत्रज्ञान | प्रा . गुरूदेव गांगुर्डे | 272-275 |
| 84 | ई पुस्तक प्रकाशन ः प्रसिध्द प्रकाशकांमार्फत एक तांत्रिक अभ्यास | प्रा . हितेश गोपाल बिजवासी | 276-280 |

VOLUME-V (I) Impact Factor: 4.205 ISSN (Print): 2394-207X
INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

# वाचन करताना वाचन संस्कृती जोपासावी

प्रा. डी. आय. शिंगाडे
ग्रंथपाल, राधाबाई काळे महिला महाविदयालय, अहमदनगर ४१४ ००१.

**सार:** सध्याच्या काळामध्ये प्रत्यक्ष पुस्तक वाचनाचे प्रमाण कमी होऊन ई–वाचन म्हणजेच मोबाईलवर, संगणकावर वाचनाचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. परंतू हया प्रकारचे वाचन त्रासदायक असल्यामुळे काही काळाने पुस्तक वाचनाचे प्रमाण वाढेल यात शंका नाही. वाचन ही काळाची गरज आहे. ''वाचाल तर वाचाल या युक्तीप्रमाणे वाचाल तर शिकाल आणि शिकाल तर खाल'' अशी सदयाची स्थिती होत चाललेली दिसत आहे. वाचनाचा छंद हा एक आगळा वेगळा छंद असल्याने तो आपण केव्हाही कुठेही, केव्हाही खेळू शकतो.

**प्रस्तावना:**आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात प्रत्येकजण धावतो आहे. प्रत्येकाने आपले दररोजचे जगणे तंत्रज्ञानाबरोबर/यंत्राशी जोडले आहे की काय! असा विचार करायला लावणारी आसपासची परिस्थिती दिसत आहे. खर तर यंत्राचा मानवावर प्रभाव पडण्यापेक्षा मानवाचा यंत्रावर प्रभाव असायला हवा व यंत्रावर नियंत्रण असायला हवं. परंतू प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळी आहे. वाचन केल्याने आपणास मन करा रे प्रसन्न असे वाटते. त्यामुळे वाचन हे आपणास आनंद देवून जाते हेच खरे. वाचनाचे प्रुमुख स्त्रोत हे ग्रंथ असून ग्रंथ हेच माझे गुरू असे एका पंक्तीत म्हटले आहे. वाचन म्हटले की आपल्यासमोर ग्रंथ, ग्रंथालये, वाचक, हस्तलिखिते, वर्तमानपत्रे यांचा आलेख दिसू लागतो. पण खरा वाचक हा रद्दीतुन देखील रत्ने शोधून काढत असतो.

वाचन साहित्याचे 'वाचन' सर्व देशातील व सर्व वयाच्या माणसांना आवश्यक आहे. 'वाचन' हे अनेक जीवनस्त्रोतांपैकी एक आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी जीवनात तणाव जास्त असल्याने शहरी भागातील व्यक्तीची करमणूक करणा–या वाचन साहित्याची जास्त गरज भासते. त्यातून ज्ञान व माहिती मिळविण्यापेक्षा, तणाव कमी करणारा आनंद, मनोरंजन व समाधान मिळू शकते. म्हणूनच वाचनाची सवय असणे व त्यासाठी ग्रंथालयांची मदत असणे या गोष्टी फायद्याच्या असतात. गुंतागुंतीच्या होणा–या परिस्थितीत मानव, वाचनावाचुन राहू शकनार नाही. कारण अशा परिस्थितीत टिकुण राहण्यासाठी 'वाचन' हा उत्तम मार्ग आहे. कारण वाचन हे आत्मविश्वास देणारे आहे. वाचनामुळे माहितीच्या गरजांचे तर समाधान होतेच, पण ज्या व्यक्ती प्रत्यक्षात आपल्यासमोर बोलू शकत नाहीत, त्या ग्रंथांच्या माध्यमातुन आपले विचार मांडू शकतात. पण ज्ञान व माहिती मिळविण्यासाठी ग्रंथांचेच वाचन करणे सोयीस्कर वाटत राहिल. पूर्वीच्या पिढित वाचनाची सवय जास्त होती. ग्रंथ हे मनोरंजनाचे व नैतिकतत्वांचे शिक्षण मिळण्याचे, कमी खर्चाचे साधन होते. पण टी. व्ही. सारखी साधने मुबलक उपलब्ध झाल्यावर वाचनाकडे दुर्लक्ष झालेले दिसते. लहान वयातच बालकांना वाचनाची सवय लागली तर आनंदी बालपणाबरोबरच जीवनाची उत्तम सुरूवातही करता येते.

भारत सरकारने 'ग्रंथ व वाचन' यांची आवड समाजात रूजविण्यासाठी इ. स. १९५७ मध्ये 'नॅशनल बुक ट्रस्ट' ची स्थापना केली. त्या ट्रस्टनेही अनेक प्रयत्न करून ग्रंथांचा व वाचनाचा प्रसार सुरू ठेवला आहे. त्यांनी इ. स. १९९२ पासून ग्रामीण भागात ३०० हून अधिक ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले. 'वाचन करी जीवन समृध्द' असे कविवर्य वसंत बापट यांनी सार्थपणे म्हटले आहे.

**आपण काय वाचतो:** रोज सकाळी उठल्यावर दिवसाची सुरूवात वर्तमानपत्राच्या वाचनाने होते. वर्तमानपत्रामध्ये बातम्यांप्रमाणे लेखही असतात. वर्तमानपत्रामध्ये ताणतणाव नाहीशे करणारे लेख, सकाळमध्ये शिदोरी, लोकमतमध्ये लोकमत सखी व परिपाठ, बोधकथा, दिनविशेष असे लेख असतात. मनाच्या स्वच्छ पाटीवर सद्गुणांची अक्षरे उमटल्यामुळे आजचे जिवन शांततेत सुखाने जाईल असा विश्वास निर्माण झाला आहे. वृत्तपत्राप्रमाणेच मासिके, साप्ताहिके यांमधुन देखील वाचनाचा आनंद मिळतो. शालेय जिवनात अभ्यासक्रमाव्यतिरिक्त बाकिची कोणतीच पुस्तके माझ्यापर्यंत वाचनात आली नाहीत. महाविदयालयात प्रवेश केल्यानंतर ययाति, झोंबी, विनपटाची चौकट, एस. आय. गिल्टी यांसारखी पुस्तके वाचली. श्यामची आई हे पुस्तक जेव्हा मी वाचण्यास घेतले तेव्हा मी ते संपविल्याशिवाय उठलो नव्हतो व एकीकडे वाचन व दुसरीकडे रडणे असे चालले होते. श्यामची आई हे पुस्तक वाचल्यावर जिवन कसे जगावे व आई म्हणजे काय हे समजते.

ग्रंथवाचनाशिवाय आपण विविध ऑडिओ कॅसेट आणुन वाचू शकतो. तसेच मोबाईलवर देखील ई–बुक्स, ई– नियतकालिके व इतर वाचन करू शकतो, आणि वाचन करू शकतो. माणसाने ग्रंथ का वाचावे! असे प्रश्न काही लोक विचारतात. तर 'वाचाल तर वाचाल' या उक्तीचा प्रत्यय प्रतिदिनी येतो. वाचनामुळे ज्ञान मिळते, माहिती मिळते मनाची मशागत होते. एवढेच नव्हे तर लेखकाच्या अनुभवविश्वाशी समरस होता येते आणि आपलेच काही अनुभव लेखकाने कागदावर उतरवले आहेत असे वाटते. कथा, कादंब–या, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने, स्फूटलेख, बोधकथा वाचताना आनंद तर वेगळाच असतो. मनाचे आरोग्य, अत्साह, कल्पकता, नाविन्य शोधण्याची आस वाचनामुळे लागते आणि गेलेल्या दिवसाचा आपण सदुपयोग केला असे वाटू लागते. मनाचे तारूण्य जपण्यासाठी आपले वाचन जीवनाचे आवश्यक अंग बनले आहे.

**दुर्मीळ ग्रंथसंग्रह:** काही ग्रंथ दुर्मीळ झाले आहेत. काही दुर्मीळ होत चालले आहेत. अशा दुर्मीळ ग्रंथांचे दुढील पिढीसाठी व्यवस्थित जतन करून ठेवणे गरजेचे आहे. दुर्मीळ ग्रंथांच्या झेरॉक्स करून ठेवणे गरजेचे आहे. व सोपा मार्ग म्हणजे त्यांचे Digitations करणे हा होय.
शहराची महत्वकांक्षा ओळखण्याचे जे निकष आहेत त्यात जुण्या ग्रंथांची देखभाल करणारी ग्रंथालय, पुराणवस्तू, संग्रहालय आणि पुराणवस्तू तसेच दुर्मीळ ग्रंथ विकणारी दुकानं महत्वाचे मानता येतील. छोटया–मोठया शहरांत दुर्मिळ ग्रंथविक्रीचा व्यवसाय हा व्यावसायिक तत्वावर चालण्याची शक्यता कमी असते. हे मान्य होईल, पण आधुनिक, अत्याधुनिक, प्रागतिक, जागतीक स्तराचं अशी बिरूदावली लावून घेणा–या महानगरात तरी दुर्मीळ ग्रंथांची विक्री करणा–या दुकानांची भरभराट असावी. पण तेही होताना दिसत नाही, तेव्हा सांस्कृतीक दृष्टया तो समाज प्रगतीपथावरून घसरत चालल्याचेच ध्यानी येते.

अरूण टिकेकरांनी अत्यंत मार्मीक शब्दात ग्रंथालय, ग्रंथ, संग्रहालय या गाष्टींना खुप मोलाच स्थान कोणत्याही काळातील समाजव्यवस्थेत असतं या संदर्भात स्पष्टीकरण दिलं आहे. त्या त्या समकालीन पिढींनी त्याचं जतन करून, त्याची वाढ करून पुढील पिढयांना नवी उमेद, प्रेरणा देणे आवश्यक असत. आज महाराष्ट्रातील हाताच्या बोटावर मोजता येतील एवढया जिल्हयातील ग्रंथालय, ग्रंथ, संग्रहायल सोडली तर बाकी जिल्हे हा संशोधनाचा विषय होऊ शकतो. एवढं गाभिर्यानं आणि कठोरपणे का लिहितो आहोत याच काहींना आश्चर्य वाटेल. माहिती तंत्रज्ञानाच्या आजच्या युगातही भरपूर लोक वाचताहेत हे खरेच आहे. अगदी वर्तमान पत्रापासुन तर कोश वाड्.मय वाचण्यापर्यंत वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परंतू खुप लोक मात्र यापासुन वंचित आहेत. खुप लोकांना वाचनाची संधी असुनही ते आळस करतात ही तर खेदाची गोष्ट आहे. म्हणुन आजच्या तरूण पिढीवर, ग्रंथालयांवर, त्यासाठी काम करणा–या सहका–यांवर, वाचनचळवळीत सहभाग घेणा–यांवर मोठी जबाबदारी येऊन पडली आहे की त्यांनी आता पुढे येवुन ग्रंथांच, ग्रंथालयांच, मुलभुत वाचनाच महत्व समाजाला पटवून दयायला हवं. तशा प्रकारच सामाजिक वातावरण तयार करायल हव.

**नवीन ग्रंथसंग्रह** नवीन पुस्तके ही वेळोवेळी प्रसिद्ध/प्रकाशित होत आहेत. परंतू कोणती पुस्तके वाचणासाठी निवडायची हे वाचकाच्या आवडीनुसार लक्षात येते. काही लेखक वाचकांना आपले पुस्तक प्रकाशित झाल्यावर मोफत वाचायला देतात.

**जात्यावरच्या ओव्या** जुन्या काळात महिला मंडळी सकाळी पहाटे उठून जात्यावर दळण–दळायच्या व त्यावेळी त्या ओव्या म्हणायच्या त्या ओव्या देखील सुप छान असायच्या. सध्या काळाच्या ओघात त्याकडे दुर्लक्ष होत चालले दिसत आहे.

**ई–बुक्स** "Online dictionary of library and information science" ODLIS नुसार "A Digital version of traditional print book designed to be read on a personal computer or on e-book reader" is known as e-book. महिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये आज इंटरनेटवर विविध सर्च इंजिनच्या साहाय्याने दररोज प्रकाशित होणारी हजारो ई–बुक्स आपण घरबसल्या, ऑफिसमध्ये मोबाईलव्दारे पाहू शकतो, वापरू शकतो. ई–बुक्सची सीडी रोम पुस्तके, व्हर्च्युअल पुस्तके, ऑनलाईन पुस्तके, नेटवर्ड पुस्तके व पेपरलेस पुस्तके अशी विविध रूपे आहेत.

**वाचक ई–बुक्स दोन प्रकारे वाचू शकतात**

१. वेबब्राउझरच्या साहाय्याने संगणकावर वाचता येणारी पुस्तके आज इंटरनेटवर उपलब्ध असणा–या ई–पुस्तकामध्ये ज्या पुस्तकांना कॉपीराईट नियम लागु होत नाही. अशी जुनी नवी लोकप्रिय शैक्षणिक पुस्तके.
२. विशिष्ट साधनावर डाऊलोड करून वाचता येणारी ई–बुक्सवाचक पुस्तक विक्रेत्याकडून अथवा प्रकाशकाकडून मुल्य देवून पुस्तके डाऊनलोड करून घेवू शकतो. या पद्धतीत बहुतांशी नवीन पुस्तकांचा समावेश होतो.

**ई–बुक्सच्या साईट:**

1. http://www.classicbookshelf.com
2. http://www.bartleby.com
3. http://www.org./div/e-books
4. http://www.shop.ebrary.com

**हस्तलिखिते** तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालयात भारतीय वनौपधींचा वापर करून हस्तलिखिताचे संरक्षण करतात. शहाजिरे एक किलो, लवंग, जिरे, आणि दालचिनी प्रत्येकी पाव किलो घ्यावयाचे आणि ते उन्हात वाळवून त्याची पुड करतात ही पुड एकत्र करून त्यांत कापूर घालतात. हे मिश्रण लिंबाचे आकाराच्या कापडी पिशव्या करून त्यात घालतात. या पिशव्या अथवा पुरचुंडया कपाटावर ठेवतात. यामुळे कृमीकीटकांना दूर ठेवले जाते. कुबट वास येत नाही. याच हेतूने डांबराच्या गोळया अथवा वडया ठेवतात.हस्तखिखिते बराच काळ टिकण्यासाठी काही उपाय योजतात. सोवळे हे अतितलम शुभ्र रंगाचे रेशमी पारदर्शक कापड असते. हे कापड कागदाचे एका बाजूस चिटकवतात. कापड चिटकवल्यानतर अक्षरेही दिसतात. कापड लावल्यावर हस्तखिखिताचे सर्व कागद ग्रंथाप्रमाणे एकत्र बांधतात. मद्रास येथील 'ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्टस् लायब्ररी' मध्ये बांधणी केलेली अनेक मराठी, संस्कृत हस्तलिखिते आणि मोडी लिपीतील कागदपत्रे बखरी आहेत. गोव्यातील दप्तरखान्यातही याप्रकारे जुनी कागदपत्रे जतन करून ठेवतात.

हस्तलिखिते जास्त काळ टिकवण्यासाठी लॅमिनेशन करतात. यासाठी टिशू आणि प्लॅस्टिकचा वापर करतात. प्रथम कागदातील आम्लता काढून टाकण्यात येते. त्यानंतर टिशू कागद त्याला चिकटवतात. यामुळे हस्तलिखिताचा कागद जास्त दिवस टिकतो. सध्या प्लॅस्टिकच्या पापुद्रयाचे आवरण घालण्यात येते. यामुळे कागदाला घडया पडत नाहीत. हस्तलिखितावरील मजकूर स्वच्छ दिसतो व पाण्यापासून बचावही होतो. हस्तलिखितांचे जतन करण्यासाठी आता त्यांचे मायक्रोफिल्मिंग करतात. हस्तलिखितांचे प्रतिरूप छायाचित्र घेण्यात येते. त्याचा आकार बारीक असतो. हस्तलिखिताची अनेक पाने एका रिळामध्ये मावतात. यामुळे हस्तलिखिते खराब वा नष्ट झाली तरी त्याची हुबेहूब प्रत संशोधकास मिळू शकते. त्याच्या अनेक प्रती काढता येतात. मायक्रोफिल्म्सवरून मोठया आकाराच्या प्रतीही निघू शकतात. या मायक्रोफिल्म्स् मायक्रोफिल्म् रीडरचे साहाय्याने वाचू शकतात. यातील एखादे पान अथवा प्रकरण हवे असेल तर त्याची हुबेहूब प्रतही मायक्रोफिल्म रीडर कम प्रिंटरचे साहाय्याने मिळू शकते. ही सोय दिल्ली येथील 'नेहरू मेमोरियल म्युझियम' मध्ये अल्प खर्चात केली आहे.

हस्तलिखिताचे संग्रह आणि जतन करणे हे फार महत्वाचे राष्ट्रीय कार्य होय. असे भारत सरकारने १९५६ मध्ये नेमलेल्या संस्कृत आयोगाने नमूद केले आहे. कारण यामध्ये भारताचा इतिहास, संस्कृती आणि विचारधन साठवलेले आहे. ज्ञानाच्या विविध शाखा, उपशाखांमध्ये अनेक लेखकांचे ग्रंथ संस्कृत आणि इतर भाषांमध्ये लिहिले आहेत. या ग्रंथांची अनेक हस्तलिखिते अजूनही अप्रसिद्ध आहेत. एकाच ग्रंथकारची वा ग्रंथाची अनेक हस्तलिखितेही उपलब्ध आहेत. त्यामुळे

एकाच ग्रंथातील विविध पाठभेदांचा अभ्यास करता येतो. अशा त—हेने संशोधन करण्यासाठी हस्तलिखिते हे महत्वाचे साधन होय.

हस्तलिखितांचे जतन आणि संरक्षण करण्याची खास तंत्रे निर्माण झाली आहेत. यास्तव याचे शास्त्रशुध्द प्रशिक्षण देण्याची सोय दिल्ली येथील 'नॅशनल आर्किव्हज् ऑफ इंडिया' ने केली आहे. या संस्थेतून प्रशिक्षण घेतलेले सेवक अनेक ठिकाणी हस्तलिखितांचे जतत आणि संरक्षण करीत आहेत. हस्तलिखिते ही राष्ट्रीय संपत्ती आहे. हा अनमोल ठेवा आहे, ही जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. सध्याच्या पुराणवस्तूसंग्रह कादयान्वये पुराणवस्तूंचा संग्रह करणे ही सामाजिक जबाबदारी मानली आहे. या कायदयामध्ये हस्तलिखितांचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे हस्तलिखितांचे जतन करण्याला तसेच त्यांचे परदेशामध्ये होणा—या विक्रीला पायबंद बसेल.

**वृत्तपत्र एक प्रसारमाध्यम:** रोज सकाळी आपल्या दिवसाची सुरूवात गरमागरम चहाने होते. परंतु हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात सर्वांना आता चहाबरोबर वर्तमानपत्रही लागतं. वेळच्या वेळी वर्तमानपत्र मिळालं नाही तर आमच्या शेजारचे आजोबा अस्वस्थ होतात. पाच मिनिटं जरी उशीर झाला तर 'किती उशीर झाला' म्हणून पेपर टाकणा—या मुलावर रागावतात. अशा अनेकांना आतुरतेनं वाट पाहायला लावणा—या या वर्तमानपत्रात असतं काय, त्यात दडलं काय असतं याची आपण आज माहिती करून घेऊया.

वर्तमानपत्राचं पहिलं पान उघडलं म्हणजे आपल्याला मोठया हेडिंगमध्ये भारतामधील तसेच परदेशातील, महत्वाच्या घटना लक्षात येतात. पेट्रोल अथवा एस. टी. ची दरवाढ असेल किंवा कोणाचा वाढदिवस असेल तसेच पारितोषिके मिळाल्याच्या बातम्या असतात. पहिल्या पानावरील बातम्या भरभर वाचल्यानंतर आतल्या पानावर नजर फिरवली जाते. मी मात्र 'क्रिडा', फिल्म यासारख्या सदरांवर नजर फिरवतो.

वृत्तपत्र हा सध्याच्या जगातील मित्र आहे. तो विश्वासू आहे. निवडणुकीचे तिकीट, एखादी अफवा अथवा एखादी गोष्ट खरी आहे की खोटी हे पाहण्यासाठी नागरिक धाव घेतात, ती वृत्तपत्राकडे. वर्तमानपत्रांचा पसारा आता खूप वाढला आहे. वर्तमानपत्रे अनेक भाषांमध्ये प्रसिदध होत असतात. तसेच ती अनेक ठिकाणांहून प्रसिध्द होतात. जिल्हा वृत्तपत्रे असतात. एखादया गावाहून प्रसिध्द होणारी वृत्तपत्रे असतात. त्यामध्ये स्थानिक बातम्यांना प्राधान्य असते. सकाळी आलेल्या बातम्या थोडया वेळात शिळया होतात म्हणून काही जण सायंकाळची वृत्तपत्रे प्रसिध्द करीत असतात. वाचकांना ताज्या बातम्या देण्यासाठी ही स्पर्धा चालू आहे. वर्तमानपत्र ही ज्ञान आणि मनोरंजन पानोपानी पुरवतात. जगातील विविध घडामोडी ते वाचकांच्या दारोदारी दररोज पुरवीत असतात. एकाच वर्तमानपत्राच्या आवृत्या आता अनेक ठिकाणांहून प्रसिध्द होतात. इंटरनेटवरी आता वर्तमानपत्रं दिसू लागली आहेत. या सर्व गोष्टींमुळं वर्तमानपत्रं ही मानवाच्या जीवनाचा आवश्यक भाग बनली आहेत. ही वृत्तपत्रं आबालवृध्द, विदयार्थी—शिक्षक, व्यापारी कारखानदार, पर्यटक, गृहिणी, सर्वांनाच हवीहवीशी वाटतात.

**समारोप:**वाचकाने सखोल वाचन करत असताना कोणत्या प्रकारच्या वाचनाला जास्त महत्व दयावे, नवीन पुस्तकांची माहिती मिळण्यासाठी बुक्स—इन—प्रिंट तपासावे, सखोल वाचनासाठी ग्रंथ सूच्यांचा वापर करावा, त्याबरोबर श्रवणभक्तीही करावी असे वाटते. वाचन ही काळाची गरज तर आहेच त्याबरोबर लिखानही त्याबरोबर केले पाहिजे. लेखन केले तरच वाचन शक्य आहे असे मला वाटते.

संदर्भ

१. महाजन शा. ग. (२०१४) वाचन संस्कृती जोपासावी; युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
२. कोण्णूर एम. वी. आणि इतर (२००८) डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्रकोश; डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
३. रिसवडकर म.रा. (२०००) संशोधन: व्याख्या आणि पदधती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, नाशिक.
४. Aher Ranganath K. (2015) Proceeding UGC sponsored National conference on Impact of information technology on college libraries (IITCL-2015).
५. Gawande Virag S., (2017) Sanshodhan Samiksha, Humanities, Social sciences, commerce education, law and language, Monthly peer reviewed international research journal, special issue January 2017; Aadhar social research and development training institute, Amravati.

*ISSN: 2394-207X (Print)*
*IMPACT FACTOR : 4.205*

# INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES

**- Published by -**
**INTERNATIONAL JOURNAL OF MULTIFACETED AND MULTILINGUAL STUDIES**
Sneh Appartment, Flat No. 001,
Samarth Nagar, New Sangvi, Pune- 411027.
Mobile No. 919766076143/919766751104,
Email: ijmms14@gmail.com
Website: www.ijmms.in

Welcome to UGC, New D × | Welcome to UGC, New D × | https://www.ugc.ac.in/jou × | Welcome to UGC, New D ×

Secure | https://www.ugc.ac.in/journallist/ugc_admin_journal_report.aspx?eid=NDc2NzQ=

## UGC Journal Details

| | |
|---|---|
| **Name of the Journal :** | International Journal of Multifaceted and Multilingual Studies |
| **ISSN Number :** | 2394207x |
| **e-ISSN Number :** | 23500476 |
| **Source:** | UNIV |
| **Subject:** | Business, Management and Accounting(all);Education;Political Science and International Relations;Social Sciences(all);veterinary(all) |
| **Publisher:** | International Journal of Multifaceted and Multilingual Studies |
| **Country of Publication:** | India |
| **Broad Subject Category:** | Multidisciplinary;Social Science |

Print

Secure | https://www.ugc.ac.in/journallist/subjectwisejurnallist.aspx?tid=aQ==

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| View | 3014 | [illegible] | Autonomic Systems | IGI-Global | [illegible] | [illegible] |
| View | 3015 | 47628 | Invertis Journal Of Science & Technology | Invertis University | 09738940 | |
| View | 3016 | 47631 | International Journal of Computational Engineering and Research | International Journal of Computational Engineering and Research | 22503005 | |
| View | 3017 | 47635 | International Journal of Energy Optimization and Engineering, IGI GLOBAL | IGI Global | 21609500 | 21609543 |
| View | 3018 | 47645 | International Journal of New Innovations in Engineering & Technology | Vishakhapatnam, India | 23196319 | 23196319 |
| View | 3019 | 47646 | international journal of educational psychology | Hipatia Press | 20143591 | |
| View | 3020 | 47657 | International Journal of Big Data Intelligence | Inderscience | 20531380 | 20531397 |
| View | 3021 | 47658 | International Journal of Computer Theory and Engineering | Umm Al Qura University, Canada | 17938201 | |
| View | 3022 | 47662 | International Journal of Innovative Technology and Creative Engineering | International Journal of Innovative Technology and Creative Engineering | 20458711 | 20458711 |
| View | 3023 | 47669 | International Journal of Information Systems and Management | Inderscience | 17513227 | 17513235 |
| View | 3024 | 47672 | International Journal of Recent Research Aspects | International Journal of Recent Research Aspects | 23497688 | 23497688 |
| View | 3025 | 47674 | International Journal of Multifaceted and Multilingual Studies | International Journal of Multifaceted and Multilingual Studies | 2394207x | 23500476 |
| View | 3026 | 47675 | International Journal of Marketing Theory | International Research Press, Serials Publications | 2230889X | |
| View | 3027 | 47677 | International Journal for Management Research | Publishing India Group, India | 22316949 | |
| View | 3028 | 47680 | International Journal of Intelligent Defence Support Systems | Inderscience | 17551587 | 17551595 |
| View | 3029 | 47683 | International Journal of Electrical, Electronic Science and Engineering, World Academy of Science, Engineering and Technology | WASET | | |
| View | 3030 | 47693 | International Journal of Knowledge and Systems Science | IGI-Global | 19478208 | 19478216 |